**एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी-०९) करीता निर्माण करण्यात आलेल्या १२ अधिसंख्य पदांना मुदतवाढ देणेबाबत.**

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
09 OCT 2025
प्राप्त झाले सही..................

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्र. संलेको-२०२३/प्र.क्र.१६१/कोषा प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०३.१०.२०२५.

**वाचा :-**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१२ अ, दि.२०.१.२०१४,
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६,
३. सामान्य प्रशासन विभाग,कार्यालयीन आदेश क्र.टिआरएन-२०२३/प्र.क्र.२६/सीपीटीपी-अ,दि.१८.०९.२०२३,
४. या विभागाचा समक्रमांक दि.२५.१०.२०२३ रोजीचा शासन निर्णय,
५. सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन पत्र क्र. टिआरएन-०९२५/प्र.क्र.६९/प्रशि-२, दि.२५.०९.२०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यसेवा (मुख्य) परीक्षा, २०२१ च्या अंतिम निकालान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ (कनिष्ठ) सहायक संचालक संवर्गातील १२ अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.३, दि.१८.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली आहे. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सीपीटीपी-९ या तुकडीतंर्गत प्रशिक्षणासाठी रुजू झालेल्या १२ उमेदवारांसाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ) सहायक संचालक संवर्गात १२ अधिसंख्य पदे दि.०३.१०.२०२३ ते दि.०२.१०.२०२५ या दोन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीकरिता निर्माण करण्यास संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती. सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.५ अन्वये कळविल्यानुसार सदर १२ अधिसंख्य पदांना दि.०३.१०.२०२५ ते दि.०२.०१.२०२६ पर्यंत ३ महिने मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सीपीटीपी-०९ या तुकडी अंतर्गत प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ (कनिष्ठ) सहायक संचालक संवर्गात १२ परिविक्षाधीन अधिकारी रुजू झाले आहेत. सदर १२ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांकरिता एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दि.०३.१०.२०२३ ते दि.०२.१०.२०२५ या २ वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीकरिता महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ (कनिष्ठ) सहायक संचालक संवर्गात १२ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास संदर्भीय शासन आदेश दि.२५.१०.२०२३ अन्वये मंजूरी देण्यांत आली होती.

२. आता सीपीटीपी-९ या तुकडीमधील सदर १२ परिविक्षाधिन अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यासाठी व विभागीय संवर्ग वाटप करण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता

असल्याने, संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेल्या १२ अधिसंख्य पदांना दि.०३.१०.२०२५ पासून दि. ०२.०१.२०२६ पर्यंत (३ महिने) मुदतवाढ देण्यात येत आहे

३. सदर १२ परिविक्षाधीन अधिकारी सदर मुदतवाढीच्या कालावधीत त्यांना शासन आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.१६१/कोषा प्रशा-२, दि.११.०३.२०२४ अन्वये खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाकरिता नेमून देण्यात आलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यरत राहतील.

४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गामध्ये मुदतवाढ देण्यात आलेल्या सदर अधिसंख्य पदावरील १२ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या दि.०३.१०.२०२५ ते दि.०२.०१.२०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीतील वेतन व भत्त्यांसाठी एकूण रु.४०,५४,६८०/- (अक्षरी रु. चाळीस लाख चौपन्न हजार सहाशे ऐंशी फक्त) एवढ्या रक्कमेच्या खर्चाच्या तरतूदीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण कालावधीतील वेतन आहरीत करण्यासाठी सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील १२ अधिसंख्य पदाच्या नियमित वेतनाचा रु.४०,५४,६८०/- (अक्षरी रु. चाळीस लाख चौपन्न हजार सहाशे ऐंशी फक्त) इतका खर्च खालील लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा :-

| **वेतन** |
|---|
| " मागणी क्र.जी-५, २०५४ कोषागार व लेखा प्रशासन ०९५ लेखा व कोषागारे संचालनालय, (००) (०१) लेखा व कोषागारे संचालनालय, (२०५४००३१) ०१ वेतन " |
| **रु.४०,५४,६८०/-** |

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६ वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६ च्या तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता.र.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

१. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई ,
३. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई*,
४. प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय *,
६. सर्व संबंधित अधिकारी *,
७. निवडनस्ती (कोषा प्रशा-२)

(* संचालक,लेखा व कोषागारे संचालनालयामार्फत)